Shikshana Prasaaraka Manadali's

# Sir Parashurambhau College

Tilak Road, Pune-411030

101

1916-2017

**Proceedings of**

**State Level Seminar on**

# "HISTORY OF MUSEUMS IN MAHARASHTRA"

# (महाराष्ट्रातील वस्तुसंग्रहालयांचा इतिहास)

**(8th October, 2016)**




**Editor**

**Dr. Sopan Shende**

Asso. Professor & Head

Dept. of History

Sir Parashurambhau College, Pune.

**Sponsored by**

Board of College and University Development (B.C.U.D.)

Savitribai Phule Pune University, Pune - 411008.

# लोकमान्य टिळक संग्रहालय (टिळक वाडा)

**डॉ. नलिनी अविनाश वाघमारे**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

प्रस्तावना :

वस्तुसंग्रहालय या शब्दाचा सरळ अर्थ होतो 'वस्तू संग्रहित केलेली जागा, इंग्रजीतील museumहा शब्द मुळात museionया ग्रीक भाषेतील शब्दापासून उत्पन्न झालेला आहे. तरीही अभ्यासकांच्या सोयीच्या दृष्टीने किमान पातळीवर स्वीकारणीय ठरले अशी एक व्याख्या ICOMया आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय समितीने जगापुढे ठेवली आहे. ''वस्तुसंग्रहालय म्हणजे नफाखोरी नसलेली एक अशी स्थायी संस्था जिचा मुख्य उद्देश समाजसेवा व सामाजिक उत्कर्ष असा आहे. आणि ती जनतेसाठी खुली ठेवली. जाऊन त्यातील सर्व संग्रहित व संवर्धित वस्तू अभ्यास, शिक्षण, आनंद, पर्यावरण व संशोधनासाठी समाजापुढे प्रदर्शित करून सामाजिक संपर्क घडवून आणते.''[१]

**व्यक्तिविशेष संग्रहालय :**

देशाच्या प्रगतीसाठी वेगवेगळ्या क्षेत्रांतील व्यक्तींनी केलेले कार्य महत्त्वाचे असते, त्याची ओळख समाजाला नसते. तेव्हा भावी काळासाठी हा वारसा जपून ठेवणे हा या संग्रहालयाचा मुख्य हेतू असतो. एखाद्या क्षेत्रातील व्यक्तीचा संपूर्ण जीवनपट समाजापुढे मांडणे गरजेचे असते. अशी संग्रहालये लहान व मोठी असतात. एखाद्या मोठ्या व्यक्तीचे जन्मठिकाण हे सुद्धा व्यक्तिविशेष वस्तुसंग्रहालय होय.[२]

पुण्यातील लोकमान्य टिळकांचे वस्तुसंग्रहालय हे लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचा जीवन, कार्य, राष्ट्रीय चळवळीतील योगदान दर्शविणारा संग्रहालय आहे.

**लोकमान्य टिळक संग्रहालय (टिळकवाडा) :**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना भारतीय राष्ट्रवादाचे भगीरथ म्हटले जाते, ते एक थोर पत्रकार, शिक्षक, लोकनायक व स्वातंत्र्ययाद्धा होते. त्यांनी आधुनिक भारताच्या राजकारणाला नवीन वळण दिले. त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला परिवर्तनकारी धोरण आखण्यास भाग पाडले. (३)

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर म्हणजे १९२० साली 'टिळकयुग' चा अस्त झाला. पुण्यावर आणि एकूणच राष्ट्रीय चळवळीवर लोकमान्यांचा जबरदस्त पगडा त्या काळात होता. पुणेकरांचे तर लोकमान्यांवर अलोट प्रेम होते व आजही आहे. या प्रेमातून टिळकांचे वास्तव्य असणाऱ्या गायकवाडवाड्यात (आजचा टिळकवाडा) अलीकडेच लोकमान्य टिळक संग्रहालय साकारले आहे. लोकमान्यांचा जीवनपरिचय आणि स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासातील काही पर्वांचे दर्शन पुढील पिढ्यांना व्हावे या हेतूने श्री. जयंतराव टिळक यांच्या मार्गदर्शनाखाली या संग्रहालयाची उभारणी झाली आहे. लोकमान्यांची अभ्यासिका त्यांच्या नित्य वापरातील वस्तू, त्यांना मिळालेली मानपत्रे, लोकमान्यांनी लिहिलेली पत्रे, त्यांच्या विख्यात ग्रंथाची हस्तलिखिते अशा विविध ऐवजांनी संग्रहालयाचे अंतरंग समृद्ध केले आहे.[४]

१९०५ मध्ये लोकमान्य टिळकांनी गायकवाड सरकारकडून हा वाडा विकत घेतला. आणि या वाड्यात राहायला आले.[५]

**लोकमान्य टिळक संग्रहालयाचे संक्षिप्त विवरण :**

१) **केसरीवाडा** : जुनी आणि नवी इमारत

२) **विंचुरकर** वाडा : सन १९०५ पर्यंत लोकमान्य टिळक याच वाड्यात राहात होते.

३) गायकवाड वाडा : सन १९०५ मध्ये सयाजीराव गायकवाड यांच्याकडून लोकमान्यांनी हा वाडा विकत घेतला आणि या वाड्यात ते राहायला आले. त्याचबरोबर 'केसरी' आणि 'मराठा' या वृत्तपत्राचे कामकाज छपाई सुरू आहे.

४) **लोकमान्य टिळकांचे निवासस्थान** : गायकवाड वाड्यात प्रवेश केल्यावर वाड्याच्या डाव्या बाजूला ही इमारत आपल्याला दिसते. याच इमारतीत लोकमान्य टिळकांचे वास्तव्य आणि अभ्यासिका होती ही इमारत आजही ऐतिहासिक वास्तू म्हणून जतन केली आहे.

५) **संग्रहालयाचे उद्घाटन** : टिळक संग्रहालयात प्रवेश करण्यापूर्वी आपल्याला संग्रहालयाची स्थापना केव्हा झाली याची माहिती असलेला फलक पाहायला मिळतो. लोकमान्य टिळक संग्रहालयाचे उद्घाटन २२ जानेवारी १९९९ साली झाले

६) **सोनिया गांधी यांच्या हस्ते उद्घाटन** : श्रीमती सोनिया गांधी यांच्या हस्ते संग्रहालयाचे उद्घाटन झाल्याचे काही फोटो देखील येथे लावले आहेत

७) लोकमान्य टिळक संग्रहालय प्रवेशद्वार

८) संग्रहालय प्रवेश : टिळक संग्रहालयाच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर आपल्याला लोकमान्य टिळकांचे जन्मगाव, रत्नागिरीयेथे असलेले त्यांचे घर, लोकमान्यांचे वडील, चुलते, लोकमान्यांचे कुटुंबीय, विंचुरकर वाडा, डक्कन कॉलेज यांचे फोटो पाहायला मिळतात.

९) **लोकमान्यांची अभ्यासिका :** याच संग्रहालयात लोकमान्यांच्या अभ्यासिकेची प्रतिकृती तयार केली आहे. या अभ्यासिकेत त्यांच्या पुस्तकांचे कपाट, टेबल, खुर्ची, पलंग, लोकमान्यांचे जोडे, आरामखुर्ची अशा लोकमान्यांच्यावापरातील वस्तू आहेत. लोकमान्य टिळक यांनी मंडाले कारागृहात असताना ज्या टेबलचा वापर करून 'श्रीमद्भगवद्गीता – गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला तो टेबलदेखील जतन केलेला आहे.

१०) **केसरी आणि मराठा :** लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या 'केसरी' आणि 'मराठा' या वृत्तपत्राच्या पहिल्या अंकाच्या प्रती आपल्याला दिसतात.

११) **'केसरी' आणि 'मराठा'**या वृत्तपत्रांच्या पहिल्या अंकाची ओरिजनल प्रत.

१२) **जुने डबल फिडर मशीन :** लोकमान्यांनी १९१९ साली विलायतेहून आणलेल्या 'डबल फिडर मशीन' चा फोटो संग्रहालयात ठेवला आहे.

छपाई व्यवसायासंबंधित विविध वस्तू :

१३) वर्णमाला :लोकमान्य टिळकानी १९०४ मध्ये तयार केलेला मराठी font / वर्णमाला संग्रहालयात पाहाता येते.

१४) **Editorial by Lokmanya Tilak:**सरकारचे डोके ठिकाणावर आहे का? राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे! यासारखे लोकमान्यांनी लिहिलेले अग्रलेख संग्रहालयात आहेत. या अग्रलेखांच्या आधारावरच लोकमान्यांवर राजद्रोहाचे खटले भरले गेले.

१५) **Article on plague:** सन १८९७ मध्ये पुण्यात प्लेग या रोगाची साथ होती. त्यावेळेस देखील सरकारच्या प्लेगवरील उपाययोजनांवर टीका करणारे लेख 'केसरी' आणि 'मराठा' यातून लिहिले.

१६) भारताचा पहिला झेंडा : शिवकालीन होन प्रमाणेच स्वतंत्र भारताचे प्रतिनिधित्व करणारा पहिला झेंडासंग्रहालयात उपलब्ध आहे. मादाम कामा यांनी हा झेंडा जर्मनी येथील 'इंटरनॅशनल सोशॅलिस्ट कॉन्फरन्स'मध्ये १९०७ साली फडकविला होता.

१७) **Movements and goods**/घटना आणि वस्तू :- संग्रहालयाच्या या भागात लोकमान्य टिळकांच्या दैनंदिन वापरातील वस्तू, स्वयंपाकाची काही भांडी, बुद्धिबळाच्या सोंगट्या आणि पट, तसेच लोकमान्यांनी लिहिलेली आणि लोकमान्यांना आलेल्या पत्रांचा समावेश आहे.

१८) नाणी आणि पोस्टाची तिकिटे : याच संग्रहालयात लोकमान्यांची प्रतिमा असलेली 'भारत सरकार टांकसाळ, मुंबई' यांनी काढलेली नाणी, पोस्टाची तिकीटे ठेवली आहेत.

१९) टिळक घराण्याचा वंशवृक्ष /Family Tree.

२०) लोकमान्यांच्या अंत्ययात्रेचा फोटो.

२१) लोकमान्यांना अहमदनगर, बेळगाव, सांगली अशा अनेक ठिकाणच्या दौऱ्यामध्ये मिळालेली मानपत्रे जतन केली गेली आहेत. तसेच लोकमान्यांचा अस्थिकलश देखील तेथे आहे.

२२) लोकमान्यांचा वारसा आजही तितक्याच जिव्हाळ्याने जपणारे, चालविणारे त्यांचे वारस (Next Generation).

**वस्तुसंग्रहालयाची उपयुक्तता आणि समर्पकता :**

१) लोकमान्य टिळक संग्रहालयाने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे प्रारंभिक जीवन, शिक्षण राष्ट्रीय चळवळीमध्ये टिळकांचा योगदानइत्यादींच्या बाबत स्पष्ट माहिती व इतिहास जतन केलेला आहे. ही वस्तुसंग्रहालये टिळकांच्या मूल्यांचा खजिना व दर्पण आहे.यासंग्रहालयातील सर्व वस्तू टिळकांच्या कोणत्या न कोणत्या तरी मूल्यांची प्रतीके ठरतात आणि म्हणूनच संग्रहालय टिळकांचे दर्शनघडवणारे दर्पण ठरते.

२) गतकाळातील मानवसमूहांचा इतिहास व संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या संग्रहांना सामान्यपणे 'इतिहास वस्तुसंग्रहालय' असे संबोधण्यात येते. या अनुषंगाने लोकमान्य टिळकांच्या जीवन व त्यांचे कार्य विवरण देणारे हे संग्रहालय वर्तमान समाजासमोर त्याचे प्रभावी प्रदर्शन घडविणे हाच मूलगामी उद्देश या वस्तुसंग्रहालयांचा आहे.

३) १८८१ साली 'केसरी' या महाराष्ट्रातल्या ऐतिहासिक भूमीका बजावणाऱ्या वृत्तपत्राची स्थापना झाली. इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेचा आवाज उठवण्याचे कामात 'केसरी' व 'मराठा' नेहमीच अग्रभागी राहिले. त्या काळात खरे तर 'केसरी' हा स्वातंत्र्य चळवळीचा मानचिन्ह बनला होता. या संग्रहालयात केसरी आणि केसरीकारांनी गेल्या १२५ वर्षांतले केसरीतले सारे अंक अत्यंत मेहनतीनं, कष्टानं आणि जीवापाड जतन करून ठेवलेले आहेत. केसरीच्या रूपात गेल्या १२५ वर्षांचा राजकीय,सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सांस्कृतिक इतिहासच जतन झालेला आहे. जुन्या अंकांच्या फाईलींचे, छायाचित्रांचे व्हिडिओ मायक्रो फिल्मिंग, सीडी आणि व्हिसीडीकरण हा राष्ट्रीय ठेवा नीटरीतीनं जतन करून ठेवण्यात अत्यंत अवघड कामही केसरी चळवळीने केले आहे आणि संदर्भासाठी, अभ्यासासाठी कुणालाही उपलब्ध करून दिले जाते.

४) वस्तुसंग्रहालयातील वस्तूंच्या रूपाने प्रकट होणाऱ्या गतकालीन अनुभवजन्य ज्ञानाचा परिचय वर्तमानातील पिढीला करून देणे नितांत गरजेचे ठरते. विशेषत: समाजातील सर्व अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना व संशोधकांना ज्ञानार्जनासाठी संग्रहालयातील सर्व वस्तू सहजतेने उपलब्ध करून देणे या अंगाने लोकमान्य टिळक संग्रहालय वरील सर्वांना उपयोगी पडते आणि लोकमान्यांच्या कार्याचे आणि स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास दाखविणारे भव्य संग्रहालय आहे.

५) लोकमान्य टिळकांच्या चरित्रातून आपल्याला स्फूर्ती मिळते. त्यांनी त्या काळात सांगितलेल्या अनेकविध कल्पना आजहीदेशासाठीमहत्त्वपूर्ण आहेत.

६) लोकमान्यांची गणेशोत्सव ही राष्ट्रीय चळवळ करण्याची अशी प्रभावी योजकता होती. आजही ह्या टिळकवाड्यात गणेश उत्सव केले जाते. पुण्यातील पाच मानांच्या गणपतींमध्ये केसरीवाडा या गणपतीचा समावेश आहे.

७) टिळक संग्रहालयअनेक इतिहासातील योगदान केलेल्या व्यक्तींचे संग्रहालय जतन करून ठेवलेला असून, हे भारतातील एक वस्तुसंग्रहालय मध्ये समावेश आहेत

**समारोप :**

लोकमान्य टिळकांच्या जीवनकार्याचे योगदान याचे सर्व विवरण लोकमान्य टिळक संग्रहालयात आहेत. लोकमान्यांचा टिळकवाडा अनेक इतिहासप्रेमी, संशोधक, मार्गदर्शक, विद्यार्थी, सामान्य जन या सर्वांमध्ये टिळकांबद्दल आदर आणि प्रेम, देशभक्ती, राष्ट्रसेवा निर्माण करण्यासाठी मार्गदर्शक आहेत. या संग्रहालयातून आधुनिक इतिहासामध्ये ब्रिटिशकालखंड टिळकयुग, जहालवाद, राष्ट्रीय कॉंग्रेसची वाटचाल इत्यादी इतिहासाची माहिती या संग्रहालयातून आपणाला मिळते.

**तळटीपा आणि संदर्भग्रंथ :**


१) पाटील शिवकुमार, इतिहासप्रदर्शक शास्त्रे, पुरातत्वशास्त्र, वस्तुसंग्रहालयशास्त्र पर्यटनशास्त्र, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१४ पृ. क्र. १०१

२) शिंदे एस. पी., इतिहासलेखनशास्त्राची तोंडओळख व इतिहासाची उपयोगिता, एज्युकेशन पब्लिकेशर्स, औरंगाबाद, २०१५ पृ. क्र. २१२.

३) टिळक, बा. गं. समग्र टिळक खंड वाङ्मय ३-७, केसरी प्रकाशन, पुणे १९७६ आणि बी. आर. जोशी इतर(संपादक) डायमंड, सामाजिक ज्ञानकोश (खंड ३) डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २००७, पृ. क्र. २२१६.

४) टिळकेकर अरुण (संपादक), शहर पुणे एक सांस्कृतिक संचिताचा मागोवा, निळुभाऊ लिमये फाऊंडेशन, पुणे २००० पृ. क्र. ३५०.

५) केरूकर खं. तु. लेख - वास्तुपुरुष (टिळक वाड्यातील पृ. क्र. १ आणि ५).

६) आधुनिक भारतीय राज्यविचार, परिमल प्रकाशन औरंगाबाद, १९९९ पृ. क्र. ८४ - ८५.

७) डॉ. टिळक दिपक ज. - लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, आधुनिक भारताचे शिल्पकार, लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्ट, पुणे २००९, पृ. क्र. ५९ - ६५.

८) **see for more detail –लोकमान्य टिळक संग्रहालय पुणे**

१) पाटील सुरेश गोपाळराव, लोकमान्य टिळकांची राष्ट्रीय एकात्मता, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१० पृ. क्र.

२) टिळक इंदू व ढवळे मृणालिनी (संपादक), संग्राहक स. वि. बापट, लोकमान्य टिळकांच्या आठवणी, केसरी प्रकाशन,पुणे २०१० पृ. क्र.

३) मेहेंदळे विश्वास, केसरीकारांच्या पाच पिढ्या, वसंत बुक स्टॉल, मुंबई २००६ पृ. क्र. २१.

९) करंदीकर ज. स. (संपादक) श्रीगणेशोत्सवाची साठ वर्षे, श्री. ज. स. करंदीकर, अध्यक्ष हिरक महोत्सव मंडळ, गायकवाडवाडा,पुणे १९५३.

१०) कुलकर्णी ए. के., लोकमान्य टिळकांचे अक्षर वाङ्मय (अर्थात गाजलेले अग्रलेख) टिळक स्मारक ट्रस्ट, २०१२.

११) वेलकर प्रताप, अव्यक्त लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, टिळक स्मारक ट्रस्ट पुणे, १९९९.

१२) मोरे सदानंद, कर्मयोगी लोकमान्य (चिकित्सक आकलन) गंधर्व वेद, प्रकाशन २०१४.